**धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई**

**पवित्र तास - शुक्रवार ०६ मे २०२२**

**गायन ः** भजतो तुला भक्तीने

प्रिय बंधूभगिनींनो, या शांत समयी सर्व कामे बाजूला ठेवून साक्रामेंतातील ख्रिस्ताचे आभार मानण्यासाठी व त्याची आराधना करण्यासाठी आपण एकत्र जमलो आहोत. आपल्या देशामध्ये शांती सलोखा नांदावा, सर्वांना सामावून घेणारे व धार्मिक स्वातंत्र्याचा आदर करणारे शासन यावे म्हणून आपण साक्रामेंतातील येशूचरणी प्रार्थना करू या.

ख्रिस्ताचे राज्य हे राजेशाहीच्या सामर्थ्याचे नव्हते किंवा राजकीय नव्हते. म्हणून ख्रिस्त म्हणतो, "कैसराचे ते कैसराला द्या, देवाचे ते देवाला द्या". ख्रिस्ताचे राज्य प्रेमाचे, शांतीचे, न्यायाचे व सत्याचे आहे. ते शाश्वत असून चिरकाल टिकणारे आहे. याची जेव्हा आम्हाला जाणीव होते तेव्हा आम्हाला परमेश्वराच्या प्रेमाची ओळख होते. दुःख व मरणावर विजय मिळवून ख्रिस्त पुनरूत्थित झाला. आमचे तारण झाले. जगाचा उद्धार झाला. आमच्या जीवनातील अंधार दूर व्हावा व आमचे जीवन ख्रिस्ताच्या प्रकाशात उजळून यावे म्हणून आपण गायन घेऊ या ः

*शांतता*

**गायन ः** ज्योती उजळू दे .... (गीत क्र. २८२)

कृपया सर्वांनी माझ्यामागे म्हणा ः

- हे ख्रिस्ता, तू आमचा तारक आहेस.
- तूच देवाचे समर्पित कोकरू आहेस.
- तू अनादि अनंत व चिरकाल देव आहेस.
- तू पवित्र मातेचे वरदान व स्वर्गीय पित्याचे अभिवचन आहेस.
- तू खरा देव आणि खरा मनुष्य आहेस.

प्रभू ख्रिस्ताने मानवावरील प्रेमामूळे कुसावर आपल्या प्राणाचे बलिदान दिले अशासाठी की सर्वांचे तारण व्हावे, प्रभूची सारी लेकरे म्हणून एक दिलाचा, एक जीवाचा ख्रिस्ती समूह निर्माण व्हावा, कारण देवाचा गौरव देवावरील विश्वासाच्याद्वारे सर्वांसाठी आहे.

*शांतता*

**वाचन ः रोमकरांस पत्र** ः ८ ः ३१ ते ३९

**चिंतन** ः देवाच्या प्रीतीस आपण प्राप्त ठरतो तेव्हा आजूबाजूची परिस्थिती बदलत असते. प्रतिकूल परिस्थिती अनूकूल बनते. आपल्या जीवनात चांगल्या गोष्टी घडत असतात. अवतीभवती सकारात्मक वातावरण असते. दुस-यांच्या दुःखात आपण समरस हातो. त्यांच्या अडचणीची आपल्याला जाणीव होते. संवेदना जागृत होते. इथेच देवाचे अस्तीत्व दिसून येते. परमेश्वर प्रेमस्वरूप आहे. ख्रिस्ताने आपणांस आज्ञा दिली, “परस्परांवर प्रेम करा”.

*शांतता*

**गायन** ः परस्परावर प्रेम करा

**विनंत्या** ः

**प्रतिसाद** ः **करितो मी याचना.**

१. प्रभूच्या प्रेमाचा संदेश जगभर देणारे आपले परमगुरू, महागुरू, धर्मगुरू व सर्व व्रतस्थ ह्यांच्या प्रेषितीय कार्यावर प्रभूचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. पुनरूत्थित ख्रिस्तावरील श्रद्धेमुळे माझे तारण झाले. ती श्रद्धा इतरांना देण्यासाठी सामर्थ्य व बळ मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आपल्या धर्मग्रामात शांतीचे, प्रेमाचे, सौख्याचे वातावरण असावे, चर्च कार्यात माझे योगदान व चर्च वरील कार्यात मी धर्मगुरूंच्या बरोबर असावे, व यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. मे महिना - रोझरीसाठी समर्पित महिना, रोझरीच्या प्रार्थनेद्वारे पवित्र मरियेच्या मध्यस्थीने देवाच्या अधिकाधिक जवळ यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्व आजारी व्यक्तींना प्रभूचा स्पर्श व्हावा, दुःखी कुटुंबियांचे सात्वन व्हावे, तरूणांना जीवनाचा मार्ग सापडावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

*शांतता*

ख्रिस्त उत्तम मेंढपाळ आहे तो आपली काळजी वाहत असतो म्हणून त्यास आपले कुटुंब समर्पण करू या.

**येशूच्या हृदयास कुटुंबांचे समर्पण**

**अंतिम गीत** ः श्री येशू .....